# कृषी विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, माळनाका रत्नागिरी ४१५ ६१२.
दूरध्वनी क्र.- ०२३५२-२२४६२७ ई मेल - adortn296@gmail.com / adortn@rediffmail.com

जा.क्र. रजिप/कृषी/कार्या-२/ २४७ /२०२३ दिनांक १३.०२.२०२३

वाचले :- १) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना जा.क्र. विप्र-७/ डॉ.बाआंकृस्वायो/तां.मा.सू/ १९९४३ /२०२२ दिनांक ०२.०६.२०२२
२) महाडीबीटी पोर्टलवरील ऑनलाईन लॉटरीद्वारे निवडलेली लाभार्थी यादी.
३) जिल्हास्तरीय निवड समिती सभा दिनांक १०.१०.२०२२
४) या कार्यालयाचे तांत्रिक मंजूरी आदेश क्र. रजिप/ कृषी/ कार्या २/ २४० /२०२३ दिनांक ०९.०२.२०२३
५) या कार्यालयाचे प्रशासकीय मंजूरी आदेश क्र. रजिप/ कृषी/ कार्या २/ २४४ /२०२३ दिनांक १०.०२.२०२३

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२२ - २३ अंतर्गत नवीन सिंचन विहीरींना कार्यारंभ आदेश देणेबाबत..**

उपरोक्त वाचले क्र. ०१ अन्वये निर्गमित झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या तांत्रिक मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन उपरोक्त वाचले क्र. ०२ अन्वये निवडलेल्या लाभार्थ्यांच्या निवडयादीला जिल्हास्तरीय निवड समितीने उपरोक्त वाचले क्र. ०३ अन्वये दिनांक १०.१०.२०२२ रोजी मान्यता दिली आहे. सदर लाभार्थ्यांच्या सिंचन विहीरींच्या अंदाजपत्रकांना, उपरोक्त वाचले क्र. ०४ अन्वये, तांत्रिक मंजूरी आणि उपरोक्त वाचले क्र. ०५ अन्वये प्रशासकीय मंजूरी देणेत आली आहे.

त्यानुषंगाने, उपरोक्त वाचले क्र. ०१ मध्ये नमूद खालील अटी व शर्तीना अधीन राहून खालील लाभार्थ्यांच्या सिंचन विहीरींच्या कामांना याद्वारे कार्यारंभ आदेश देणेत येत आहे.

| अ.क्र | तालुका | गाव | लाभार्थ्याचे नाव | तांत्रिक मंजूरीची रक्कम रुपये | प्रशासकीय मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिपळूण | टेरव | श्री. राजेश गंगाराम कदम | २५००००/- | २५००००/- |
| २ | | खंडोत्री | श्रीम. स्मिता सिद्धार्थ मोहिते | २५००००/- | २५००००/- |
| ३ | रत्नागिरी | निवळी | श्रीम. वैयजंती सखाराम सावंत | २५००००/- | २५००००/- |
| ४ | लांजा | पडवण | श्री. भाई भिवा पडवणकर | २५००००/- | २५००००/- |
| ५ | | बुद्धवाडी त. देवधे | श्री. श्रीकांत गणाजी कांबळे | २५००००/- | २५००००/- |
| ६ | राजापूर | ओणावली | श्री. अनंत यशवंत जाधव | २५००००/- | २५००००/- |

अटी व शर्ती :-

१. या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.
२. ज्या सर्व्हे क्रमांकामध्ये नवीन सिंचन विहिर मंजूर झाली आहे त्याच जागेत काम करणे बंधनकारक राहील. अन्यथा नवीन विहीरीचे अनुदान आदा केले जाणार नाही.
३. कृषी अधिकारी (विघयो) पं. स. यांनी कामाचे लाईनआऊट दिलेनंतर लाभार्थ्यांनी एका महिन्याच्या आत नवीन सिंचन विहीरीचे खोदकाम सुरु करावे. अन्यथा सदर विहीर रदद करणेचा अधिकार जिल्हा स्तरीय निवड समितीस राहील.
४. प्रस्तावित विहीरीपासून इतर विहीरींचे अंतर ५०० फूटापेक्षा जास्त असावे.
५. नवीन विहीरीचे खोदकाम व बांधकाम हे अंदाजपत्रकानुसार पूर्ण करणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.
६. नवीन विहीरीचे खोदकाम पूर्ण झालेनंतर बांधकाम करणे अनिवार्य आहे. अन्यथा सिंचन विहीरीचे काम अपूर्ण समजणेत येऊन उर्वरीत मंजूर अनुदान दिले जाणार नाही.
७. नवीन सिंचन विहीरीचे खोदकाम करताना मजूरांच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील.
८. नवीन विहीरीचे काम पूर्ण झालेनंतर प्राधान्याने पुनर्भरण करावे.
९. सिंचन विहीरीसाठी उच्चतम अनुदान मर्यादा र. रु. २.५० लाख आहे. जादा होणारा खर्च लाभार्थ्यास करावा लागेल.
१०. महाडीबीटी पोर्टलवरुन वारंवार प्राप्त होणा-या सूचनांचे पालन करणे लाभार्थ्यांना बंधनकारक राहील.
११. सिंचन विहीरीचे काम पूर्ण झालेनंतर त्याची नोंद ७/१२ उता-यावर करुन घेऊन त्याबाबतचे अभिलेखे पंचायत समितीस सादर करणेची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.
१२. अनुदान वितरण हे लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बॅन्क खात्यात वर्ग करणेत येईल. त्यासाठी लाभार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर आधार प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या **https://www.zpratnagiri.org/** या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक **२०२३०२१६९१०६९** असा आहे.

कृषी विकास अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- गटविकास अधिकारी पंचायत समिती व कृषी अधिकारी (विघयो) .......................... यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner